## महत्त्वाचे

### तालुका संघटकपदी सी. एस. सोनवणे



औरंगाबाद : भारतीय जनता पार्टीच्या अनुसूचित जाती विभागाच्या औरंगाबाद तालुका संघटकपदी सी. एस. सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेश निमंत्रित सदस्य बाबूराव नरवडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

### राष्ट्रवादी काँग्रेसची उद्या संविधान पालखी

औरंगाबाद : येत्या २६ नोव्हेंबर रोजी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या वतीने संविधान दिनानिमित्त संविधान पालखी काढण्यात येणार आहे. सकाळी ११ वा. या पालखीची सुरुवात क्रांतीचौकातून होईल व पैठणगेट येथे विसर्जन होईल. आम्हाला राज्य घटनेने दिलेला अधिकार आणि स्वातंत्र्यावर कुणीही गदा आणू शकत नाही. हा देश आमचा आहे आणि आम्हाला बोलण्याचे, टीका करण्याचे व आंदोलन करण्याचे स्वातंत्र्य आहे. ज्या आधारावर हा संपूर्ण देश टिकून आहे, अशा या राज्य घटनेचा सन्मान दिवस आम्ही संविधानाची पालखी काढून साजरा करीत असल्याचे आज यासंदर्भात घेण्यात आलेल्या पत्रपरिषदेत अभय पाटील, फिरोज पठाण, मयूर सोनवणे, अमोल दांडगे, भारत पवार आदींनी म्हटले आहे.

### अंतिम प्रभाग रचना व आरक्षणाची अधिसूचना

औरंगाबाद : जिल्ह्यातील जि. प. निवडणूक विभाग व निर्वाचक गण प्रारुप रचना व आरक्षणास १० ऑक्टोबर रोजी प्रसिद्धी देण्यात आली. या प्रारुप प्रभाग रचना व आरक्षणावर दि. १० ते २० ऑक्टोबर २०१६ पर्यंत हरकती स्वीकारण्यात आल्या. या हरकतींवर २५ ऑक्टोबर रोजी विभागीय आयुक्त कार्यालयात सुनावणी घेण्यात आली व दि. १७ नोव्हेंबर रोजी हरकतींवर निर्णय देऊन अंतिम प्रभाग रचना व आरक्षणास मान्यता देण्यात आली आहे. २५ नोव्हेंबर रोजी यासंबंधीची अधिसूचना शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येणार आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

### देवगिरी महाविद्यालयात 'आविष्कार'चे उद्या उद्घाटन

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांची संशोधनात्मक वृत्ती व नवोन्मेष विकसित करण्यासाठी 'आविष्कार' महोत्सवाचे आयोजन जिल्हानिहाय केले आहे. या अंतर्गत देवगिरी महाविद्यालयात मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्या हस्ते शनिवारी (दि.२६) सकाळी १० वाजता 'आविष्कार'चे उद्घाटन होणार असल्याची माहिती प्रा. विष्णू पाटील व डॉ. भास्कर साठे यांनी दिली. यात मानव्यविद्या, सामाजिक शास्त्रे, भाषा आणि वाङ्मय, ललित कला या विद्याशाखेतील सुमारे २५० संशोधक सहभागी होणार आहेत.

'सीईओं'ची माहिती : रोजगार हमीच्या कामात गैरव्यवहार

# अपहारित रक्कम वसूल करण्यासाठी नोटिसा

औरंगाबाद : गंगापूर तालुक्यातील आगर कानडगाव येथे रोजगार हमी योजनेच्या कामात झालेल्या गैरव्यवहारास कारणीभूत सर्व ११ जणांना अपहारित रकमेचा सात दिवसांत भरणा करावा, अन्यथा पोलिसांत गुन्हा दाखल करू, या आशयाच्या नोटिसा बजावण्यात आल्या आहेत, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मधुकर आर्दड यांनी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी आर्दड म्हणाले की, गंगापूर तालुक्यात रोजगार हमी योजनेच्या कामात आर्थिक अपहार झाल्याप्रकरणी ११ अधिकारी-कर्मचारी जबाबदार आहेत. अपहार केलेल्या रकमेचा भरणा करण्यासाठी ११ जणांमध्ये अपहारित रक्कम विभागणी करण्याचा जि.प. प्रशासनाने निर्णय घेतला. मात्र, यापैकी कोण किती जबाबदार आहे. कोणाकडून किती निधी वसूल केला जावा, याबद्दल जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले होते. या प्रक्रियेस थोडा विलंब झाला. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर लगेच दोषी ११ अधिकारी- कर्मचाऱ्यांना सदरील रक्कम भरणा करावी, अन्यथा तुमच्याविरुद्ध पोलिसांत गुन्हे दाखल केले जातील, या आशयाच्या नोटिसा त्यांना बजावण्यात आल्या आहेत. यापैकी काही जणांनी रक्कम भरण्याची तयारीही दर्शवली आहे.

### चौकशी : गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न



- आगर कानडगाव येथील रोजगार हमीच्या कामात झालेल्या गैरव्यवहारास कारणीभूत लोकांवर कारवाई करण्यासंदर्भात विलास दंडे यांनी ॲड. रामदास शिनगारे पाटील यांच्यामार्फत जनहित याचिका दाखल करुन चौकशीची मागणी केली होती.
- चौकशीअंती वरील कामात गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन संबंधितांवर कायद्यानुसार कारवाई करण्याचे शपथपत्र जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दाखल केले होते. त्यावरुन खंडपीठाने याचिका निकाली काढली होती. मात्र, निकालानंतर तब्बल २२ महिने उलटले तरी संबंधितांवर शपथपत्रानुसार कारवाई केली नाही. म्हणून याचिकाकर्त्यांनी अवमान याचिका दाखल केलेली आहे.

# मनपाचा 'कारभार' मध्यरात्रीनंतर चालतो!

औरंगाबाद : शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यासाठी मागील वर्षभरापासून मनपाकडून जोरदार प्रयत्न सुरु आहेत. या कामासाठी चार महिन्यांपूर्वी निविदा काढली. या निविदा प्रक्रियेत अनेक विघ्न येत असल्याने प्रशासनाने मुदतवाढीचे धोरण स्वीकारले आहे. बुधवारी रात्री ११ वाजून ५४ मिनिटांनी निविदेची मुदत वाढविण्यात आल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. एवढ्या रात्री निविदेची मुदत वाढविण्याची वेळ मनपावर का आणि कशासाठी आली असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

मालमत्ता सर्वेक्षणासाठी निविदा काढण्यात आली. मालमत्ता कर लावण्याचे उपनियम तयार नाहीत म्हणून शिवसेनेच्या काही मंडळींनी निविदा प्रक्रियेत खोडा घातला. प्रशासनाने उपनियम तयार केले. त्यानंतर सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली नाही. नागरिकांच्या सूचना हरकती मागवा असे सूचित करण्यात आले. मागील सहा महिन्यांपासून मनपा प्रशासन निविदेस मुदतवाढ देत असल्याने या कारभारावर शंका उपस्थित करण्यात येत आहे.

### निविदा प्रक्रियेला मुदतवाढ

- निविदा प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली. ठेका घेण्यासाठी काही कंत्राटदार सरसावले. त्यानंतर अचानक मनपाने निविदा प्रक्रिया रद्द केली. लगेचच दुसरी निविदा काढण्यात आली. निविदा भरण्याची शेवटची तारीख ९ नोव्हेंबर होती. ७ नोव्हेंबर रोजी मनपा आयुक्तांनी निविदा भरण्याच्या प्रक्रियेस २५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ दिली. आता २३ नोव्हेंबरला रात्री प्रशासनाने निविदा प्रक्रियेला १२ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. मुदतवाढ कोणाच्या सांगण्यावरुन देण्यात येत आहे, असा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते रमेश इधाटे यांनी उपस्थित केला आहे.

# भिल्ल आदिवासी समाजाचा मेळावा

औरंगाबाद : भारतीय भटके विमुक्त आदिवासी संघर्ष समितीच्या वतीने रविवार, दि. २७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वा. जि. प. शाळा, अब्दीमंडी येथे भिल्ल आदिवासी समाजाचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

संविधान दिनानिमित्त होणाऱ्या या मेळाव्याचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत ग. ह. राठोड यांच्या हस्ते होईल. महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अशोक जाधव धनगावकर हे राहतील. तर प्रमुख पाहुणे म्हणून अंबादास रगडे, राजपालसिंह राठोड, अनिल माळोदे, विलास कटारे, राजेंद्र बागूल, गोरख मोरे, राजभान खडसने, डॉ. अरुण कोळी आदींची उपस्थिती राहील.

या मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन संजय तुरे, टी. एस. चव्हाण, जगन बाबर, प्रकाश वाघमारे, छबूराव सोनवणे, रतन सोनवणे, रमेश गोंधळे, अशोक पवार, सुभाष गायकवाड, बाळू गायकवाड, साहेबराव सोनवणे, अशोक मोरे, वंदना बोरसे, शोभाबाई गायकवाड, मंगल मोरे, रेना सोनवणे, सीताबाई सूर्यवंशी, हौसाबाई पवार, झुंबरबाई माळी आदींनी केले आहे.



रेअर शेअर... औरंगाबाद मॅनेजमेंट असोसिएशनतर्फे आयोजित रेअर शेअरच्या ४० व्या सत्रात मार्गदर्शन करताना उद्योजक भावुक त्रिपाठी. यावेळी पद्मश्री डॉ.नौशाद पद्मसी, उद्योजक पी. आर. बंटवाल यांच्यासह शहरातील उद्योजकांची उपस्थिती होती.

# हैं तय्यार हम...

Aurangabad Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
11 Dec 2016

Brought to you by SAFFRON LANDMARKS

Powered by MK CONSTRUCTIONS CREATIONS FOR LIFETIME



मी धावणार माझ्यासाठी

"माझा सहभाग मी या मॅरेथॉनमध्ये निश्चित केला आहे. माझे हृदय निरोगी राहावे, यासाठी मी या मॅरेथॉनमध्ये धावणार आहे.

-डेनिस विल्सन (केनिया)




सकल मारवाडी युवा मंच... (डावीकडून) मुकेश सोनी, मुकेश तिवारी, नरेश मोर, आशिष मेहता, नितीन तोतला, संतोष तिवारी, निखिल मित्तल, संजय मंत्री (अध्यक्ष), सुनील खाबिया (प्रदेशाध्यक्ष), विकास पाटणी, हर्षल उपाध्याय, संजय दरख, अशोक शिवाल, सुदर्शन जाजू, नितीन भक्कड, श्रीकांत उपाध्याय.

Co-Sponsors: RAJURI STEEL | SARA INSPIRED BY YOU | श्री धनेश्वरी शैक्षणिक संकुल | VANSH GROUP REALITY BEYOND EXPECTATION | ERA INTERNATIONAL SCHOOL

Powered by: YOU TOO CAN RUN | Health & Fitness Partner: RELAX-ZEAL | Mall Partner: PROZONE | Food Partner: KREAMN KRUNCH | Outdoor Partner: abhishek advertising & marketing (i) pvt.ltd | Partners: रवि मसाले | blueumbrella

**नाव नोंदणी व सहभागासाठी**

www.mycitymarathon.com वर ऑनलाईन प्रवेशिका भरु शकता किंवा मॅरेथॉनची प्रवेशिका छोटी जाहिरात कार्यालय, लोकमत भवन, जालना रोड, औरंगाबाद येथे उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ०२४०-६६०४५०२




सॅफ्रॉन लँडमार्कस... (डावीकडून) भारत जैन, मनीष पारीख, महेश लाभशेटवार, ललित झांबड, अनिल मुनोत, विठ्ठलराव लाभशेटवार, डॉ. योगेश वरगंटवार, मनोज काला, राजेश वरगंटवार.

### घाटी तयार करणार व्हिजन डॉक्युमेंट

औरंगाबाद : घाटी रुग्णालय आगामी दहा वर्षांचे व्हिजन डॉक्युमेंट तयार करणार आहे. यामध्ये सध्याच्या सोयी-सुविधा आणि पुढील काही वर्षांमध्ये आवश्यक असलेल्या सुविधांची माहिती नमूद केली जाणार आहे. व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्याच्या दृष्टीने गुरुवारी अधिष्ठातांच्या कक्षात सर्व विभागप्रमुखांची बैठक घेण्यात आली. डॉक्युमेंटसाठी पाच सदस्यीय समिती गठीत केली आहे.

# लोकमत व व्हीआयटी विद्यापीठ यांच्या वतीने फ्युचर मंत्रा सेमिनार

उपक्रम : ११ वी, १२ वीतील विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन

औरंगाबाद : बारावीनंतर नेमके काय करावे, हा अनेक विद्यार्थ्यांना विचारात टाकणारा प्रश्न आहे. आज करिअर कुठल्याही एक-दोन क्षेत्रांसाठी मर्यादित राहिले नाही. विद्यार्थ्यांना त्यांच्या मनाजोगे करिअर निवडण्यासाठी आता अनेक संधी उपलब्ध आहेत. ११ वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांना करिअरसंबंधी पडणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरे व करिअरची माहिती देण्यासाठी 'लोकमत' आणि व्हीआयटी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने २७ नोव्हेंबर रोजी 'फ्युचर मंत्रा' या सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे.

'लोकमत' भवन येथे सायंकाळी ५ वाजता या सेमिनारला सुरुवात होणार आहे. १२ वीनंतर नेमके काय करावे, कोणते स्पेशलायझेशन करावे, त्यासाठी योग्य इन्स्टिट्यूट कसे निवडावे, ॲडमिशनची पद्धत कशी असणार, त्यासाठी कोणती तयारी करावी लागते. यासारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे 'फ्युचर मंत्रा' कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना मिळणार आहेत. वाढत्या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट करिअर करण्याची युवकांची इच्छाशक्ती असते. या इच्छाशक्तीला योग्य मार्गदर्शनाची जोड मिळाली तर यश आपल्याच मुठीत आहे. शिक्षणाच्या या टप्प्यावर पडणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी लोकमतने या सेमिनारद्वारे विद्यार्थ्यांना एक प्रकारचे व्यासपीठ उपलब्ध करुन दिले आहे. विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी हे सेमिनार मार्गदर्शन ठरणार आहे. सेमिनार मोफत आहे. यात गिरीश जोशी व राजा दास हे तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. या संधीचा लाभ विद्यार्थी व पालकांनी घ्यावा तसेच अधिक माहितीसाठी ८८५६८००३०१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

### बक्षीस जिंकण्याची संधी

- सेमिनारदरम्यान विद्यार्थ्यांना भरघोस बक्षिसे जिंकण्याची संधीही मिळणार आहे. उपस्थित विद्यार्थ्यांमधून काही लकी ड्रॉ काढण्यात येणार आहेत. लकी ड्रॉ मधील विजेत्या विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येतील.

लोकमत | VIT UNIVERSITY VELLORE • CHENNAI www.vit.ac.in Present FUTURE मंत्रा

# खाद्य विक्रेत्यांवर महापालिकेकडून कारवाईचा बडगा

औरंगाबाद : शहराच्या वेगवेगळ्या भागात सायंकाळी ५ वाजेनंतर खाद्यपदार्थ विक्रेत्यांच्या गाड्या लागतात. या हातगाड्यांमुळे वाहतुकीला प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. दररोज सायंकाळी ५ ते रात्री ९ वाजेपर्यंत महापालिकेकडून हातगाडीचालकांवर कारवाई करण्यात येणार आहे. या कामासाठी स्वतंत्र पथकाचीच नियुक्ती करण्यात आली आहे. बुधवारी रात्री मनपाने औरंगपुरा, क्रांतीचौक, रेल्वेस्टेशन रोड, बाबा पेट्रोल पंप आदी भागांत कारवाई केली.

महापालिका सायंकाळी कारवाई करीत नसल्याने हातगाडीचालक निवांत व्यवसाय करीत होते. मनपा आयुक्त ओम प्रकाश बकोरिया यांनी सायंकाळीही मनपाने कारवाई करावी यासाठी स्वतंत्र पथक नेमले आहे. मंगळवारपासून या पथकाने कामाला सुरुवात केली. बुधवारी सायंकाळी जिल्हा परिषदेच्या कार्यालयासमोर ४ साबूदाणा वडा विकणाऱ्या हातगाड्यांवर कारवाई करण्यात आली. क्रांतीचौकात रस्त्यावर खाद्यपदार्थ विकणाऱ्यांच्या गाड्या, साहित्य जप्त करण्यात आले. झाशीची राणी पुतळ्याजवळ ३ हातगाडीचालकांना हाकलून लावण्यात आले. बाबा पेट्रोल पंप ते रेल्वेस्टेशन रोडवर वॉकिंग प्लाझा येथे भाजीपाला विकणाऱ्या विक्रेत्यांचे तराजू जप्त करण्यात आले.

गुरुवारी मनपाच्या पथकाने औरंगपुरा, गोमटेश मार्केट, पैठणगेट, रॉक्सी चित्रपटगृह परिसर टिळकपथ आदी भागात कारवाई केली. दररोज रात्री ही कारवाई सुरू राहणार असल्याचे उपायुक्त रवींद्र निकम या योजनेचे समन्वयक एस. एस. कुलकर्णी यांनी सांगितले.

### खाद्यपदार्थ घाटीत वाटप

- मनपाच्या अतिक्रमण हटाव पथकाने बुधवारी रात्री क्रांतीचौक येथे दोन खाद्यपदार्थ विकणाऱ्या हातगाड्यांवर कारवाई केली. त्यांच्याकडील खाद्यपदार्थही जप्त करण्यात आले. हे अन्न फेकून देणेही अधिकाऱ्यांना संयुक्तिक वाटले नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीनंतर कर्मचाऱ्यांनी खाद्य घाटीत व परिसरात रुग्णांच्या नातेवाईकांना दिले. नागरिकांनी आनंदाने त्याचा स्विकार केला.

तडजोड : नोट तुटवड्यावर बँकांचा उपाय; हळूहळू परिस्थिती सुधारते

# ग्रामीण भागातील बँकेच्या नोटा शहरात

औरंगाबाद : ग्रामीण भागापेक्षा शहरात नोटांचा तुटवडा अधिक आहे. त्यामुळे रिझर्व्ह बँकेने तालुक्यातील बँकांना पाठविलेल्या नोटा शहरातील बँकांकडे वळविण्यात येत आहेत. टंचाईवर मात करण्यासाठी बँकांनी आपसी तडजोडीचा हा मार्ग शोधल्यामुळे शहरात मागणीपेक्षा कमी का होऊना परंतु नोटा मिळत आहेत.

सध्या राष्ट्रीयीकृत बँकांनी आपले लक्ष शहरातील नोटांचा पुरवठा सुरळीत करण्यावर दिले आहे. ग्रामीण भागात नोटा उपलब्ध करून देण्यात येत आहे; पण तेथील बहुतांश एटीएम चालू नसल्याने ती रक्कम शहरी बँकांकडे वळविली जात आहे. रिझर्व्ह बँकेने या आठवड्यात जिल्ह्यासाठी एकही कंटेनर पाठविला नाही. यामुळे राष्ट्रीयीकृत बँका, सहकारी बँका, पतसंस्थेमध्ये नाण्यांचा तुटवडा जाणवत आहे.

गुरुवारी स्टेट बँक ऑफ हैदराबादमध्ये नोटांचा तुटवडा जाणवला. व्यवस्थापनाने यंत्रणा हलविली व पैठण, वैजापूर येथील त्यांच्या शाखेतून नोटा मागविल्या. शहरातील विविध शाखांमध्ये थोड्या-थोड्या वाटप केल्या. या बँकेच्या प्रत्येक शाखेला दररोज १२ लाखांची आवश्यकता असते. या बँकेच्या अनेक शाखांमध्ये बुधवारीच नोटांचा तुटवडा जाणवला. बँक व्यवस्थापनाने ग्रामीण भागातील शाखांतून नोटा आणून शहरातील शाखांची गरज पूर्ण केली.

### हैदराबाद बँकेत ६०० कोटींच्या बाद नोटा

- स्टेट बँक ऑफ हैदराबादच्या करन्सी चेस्टमध्ये ५०० व हजार रुपयांच्या ६०० कोटींच्या नोटा जमा झाल्या आहेत. स्टेट बँक ऑफ हैदराबाद व स्टेट बँक ऑफ इंडिया या दोन बँकांसमोर सर्वाधिक गर्दी दिसून आली. बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की, हैदराबाद बँकेच्या करन्सी चेस्टमध्ये ६०० कोटींच्या नोटा जमा झाल्या आहेत. अजूनही अन्य शाखांमध्ये मोठ्या प्रमाणात बाद नोटा जमा झाल्या आहेत. त्या ठेवण्यासाठी तिजोरी कमी पडत आहेत. अनेक नोटांवर धूळ साठलेली आहे, काही नोटांमधून घाण वासही येत आहे. या नोटांवरील धूळ साफ करून मग यंत्रात टाकून मोजणी केली जात आहे. लवकरच या बँकेची पहिली खेप कंटेनरद्वारे रिझर्व्ह बँकेला पाठविण्यात येईल.

### २००० च्या नोटामुळे बँकेकडे पाठ

- सध्या बँकेत १०० च्या नोटापेक्षा नवीन २ हजारच्या नोटा जास्त मिळत आहे. असाच अनुभव एटीएमवरही येत आहे. काही बँकांमध्ये फक्त २ हजारच्या नोटा दिल्या जात आहे. या नोटांचे सुटे मिळत नसल्याने व्यवहारात या नोटा कमी प्रमाणात चालत आहे. यामुळे या नोटा घेऊन काय करायचे असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. परिणामी, खातेदारांनी बँकांकडे पाठ फिरविल्याने बँकांमध्ये कमी गर्दी दिसत आहे.

### ५०० च्या नवीन नोटेची प्रतीक्षाच



५०० रुपयांची नवीन नोट शहरात दाखल झाल्याचा संदेश व्हॉटस् ॲपवर फिरतो आहे. शहरात विशेषत: व्यापारी वर्गात या नोटेचीच चर्चा दिसून आली; परंतु रिजर्व्ह बँकेचे कंटेनर या आठवड्यात अजूनही आले नाही. यामुळे नवीन ५०० ची नोट येण्याचा प्रश्नच नाही, असे बँकेच्या सूत्रांनी सांगितले. शहरातील काही नागरिकांनी मुंबईहून या नोटा आणल्याची चर्चाही सुरु आहे.

